# कृषि पणन विषयक बातम्या : डिसेंबर 2024

Agrowon, 30/12/2024

अ‍ॅग्रो मार्केट

## मध्य प्रदेशातील ८३ बाजार समित्यांमध्ये ई-बाजार व्यवस्था

### नव्या वर्षापासून ४१ बाजार समित्यांमध्ये नव्याने प्रणाली लागू करणार

**अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा**

नागपूर : शेतीमाल विक्रीची प्रक्रिया सुलभ होण्यात योगदान देणाऱ्या ई-बाजार व्यवस्थेला मध्य प्रदेश सरकारकडून प्रोत्साहन दिले जात आहे. त्याच प्रयत्नाअंतर्गत एक जानेवारीपासून ४१ बाजार समित्यांमध्ये नव्याने ई-बाजार प्रणाली लागू केली जाणार आहे. यापूर्वी ४२ बाजार समित्यांमध्ये ही प्रणाली असल्याने ई-बाजार प्रणाली असलेल्या राज्यातील एकूण बाजार समित्यांची संख्या ८३ वर पोहोचणार आहे.

शेतीमालाच्या हमीभावाने खरेदीला प्रोत्साहन, दुबार, तिबार तसेच व्यावसायिक पीकपद्धतीला प्रोत्साहन मिळावे याकरिता सिंचन सुविधा वाढविण्यावर भर यासह इतर अनेक उपाययोजना राज्य सरकारकडून शेतकरी हिताच्या दृष्टीने राबविल्या जात आहेत. त्यामुळे मध्य प्रदेशने शेतकऱ्यांसाठी कल्याणकारी राज्य म्हणून ओळख निर्माण केली आहे. ही ओळख कायम ठेवत राज्यात येत्या काळात शेतीमाल विक्रीसाठी पूरक अशा ई-बाजार व्यवस्थेला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

राज्यात सध्या ४२ बाजार समित्यांमध्ये ई-बाजार च्या माध्यमातून ऑनलाइन खरेदी विक्रीची व्यवस्था आहे. एक जानेवारीपासून त्यात नव्या ४१ बाजार समित्यांची भर पडेल. त्या माध्यमातून सुमारे ८३ बाजारात ही व्यवस्था उभी राहणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने राज्यातील सर्वच बाजार समित्यांना या कक्षेत आणले जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### सर्व प्रक्रिया ऑनलाइन, अ‍ॅपमधून

ई-बाजार संकल्पनेत शेतकऱ्यांना बाजारात नोंदणी करण्यापासून ते लिलाव प्रक्रिया आणि खात्यात पैसे हस्तांतर होईपर्यंची सारी प्रक्रिया ऑनलाइन व अ‍ॅपच्या माध्यमातून पार पाडली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना नोंदणीकरिता तासन्‌तास रांगेत लागण्याची गरज पडत नाही. त्याकरिता बाजार समित्यांना देखील हायटेक करण्यावर भर देण्यात आला आहे. शेतीमाल विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी खास अ‍ॅप विकसित करण्यात आले असून त्यावर एकदाच नोंदणी करावी लागते.

# अशांत शेतकरी, निवांत सरकार



अनिल घनवट
९९२३७०७६४६

**भारतीय किसान युनियनचे नेते जगजितसिंग डल्लेवाल यांच्या नेतृत्वाखाली अतिशय संयम पाळत, लोकशाही मार्गाने शांततेत दिल्ली सीमेवर शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. सरकारने प्रश्न सोडविण्यास इतकी दिरंगाई करणे अपेक्षित नाही. हे आंदोलन जर भारतभर पसरले तर सरकारला खूप महागात पडू शकते.**

पूर्वार्ध

दिल्लीच्या सीमेवर पुन्हा शेतकरी एकत्र आले आहेत व हे आंदोलन २०२०-२१ सारखेच पुन्हा लक्षवेधी ठरण्याची शक्यता दिसत आहे. दहा महिन्यांपासून आंदोलक शेतकरी दिल्ली पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. जिथे अडवले तिथे शांतपणे बसले आहेत. शेतकऱ्यांना रोखण्यासाठी ज्या पद्धतीने सरकार बळाचा वापर करीत आहे, ते मात्र क्लेशदायक आहे. केंद्र सरकार आंदोलक नेत्यांशी थेट बोलणी करण्याऐवजी एक समिती स्थापन करून चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्नात आहे. आंदोलक नेते मात्र कोणत्याही समितीशी चर्चा करण्यास तयार नाहीत. भारतीय किसान युनियनचे नेते जगजितसिंग डल्लेवाल यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे व आता त्यांची शारीरिक परिस्थिती चिंताजनक झाली आहे.

**आंदोलन भारतभर पसरू शकते**

मागील आंदोलनात एकत्र असलेल्या संयुक्त किसान मोर्चामध्ये फूट पडली होती व जगजितसिंग डल्लेवाल यांनी हे आंदोलन स्वतंत्रपणे सुरू केले होते. इतरही काही गट त्यांच्या मदतीला आहेत पण तोडगा निघण्यास विलंब होत असल्यामुळे इतर संघटनाही डल्लेवाल यांच्या पाठीशी उभे राहण्यास सरसावल्या आहेत. खरे तर डल्लेवाल यांच्या नेतृत्वाखाली अतिशय संयम पाळत, लोकशाही मार्गाने शांततेत आंदोलन सुरू आहे. सरकारने प्रश्न सोडविण्यास इतकी दिरंगाई करणे अपेक्षित नाही. हे आंदोलन जर भारतभर पसरले तर सरकारला खूप महागात पडू शकते.

**किरकोळ मागण्यांचा तातडीने व्हावा विचार**

आता सुरू असलेल्या आंदोलनातील अशा काय मागण्या आहेत की सरकार त्या मंजूर करू शकत नाही? माझ्या मते सरकारची इच्छा असेल तर बऱ्याच मागण्या तातडीने मान्य करणे शक्य आहे. त्यातील, मागील आंदोलनातील खटले मागे घेणे, लखिमपूर खिरी प्रकरणातील मृतांच्या कुटुंबीयांना सहाय्यता करणे व आरोपींवर तातडीने कारवाई करणे सहज शक्य आहे. इतर गुन्हेगारांचे एन्काउंटर करून खातमा करण्यात उत्तर प्रदेशचा हातखंडा आहे, मग या प्रकरणात न्यायालयीन प्रक्रियेतून जलदगतीने न्याय देण्यास काय अडचण आहे? या घटनेचे व्हिडिओ उपलब्ध आहेत त्या आधारे तातडीने न्याय देणे शक्य आहे. भूमी अधिग्रहण विषयी आंदोलकांच्या मागण्या रास्त आहेत, त्या तातडीने मंजूर केल्या जाऊ शकतात.

**कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांचा हक्क**

शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, ही मागणी प्रामुख्याने केली जात आहे. शरद जोशींच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटना गेली चाळीस वर्षे ही मागणी करीत आली आहे. शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येते असा निव्वळ देखावा केला जातो प्रत्यक्षात भारतातील शेतकऱ्यांना उणे अनुदान मिळते हे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. काही महिन्यांपूर्वी प्रकाशित झालेल्या 'ओईसीडी'च्या अहवालात स्पष्ट म्हटले आहे, की २०२३ या एका वर्षात गहू, तांदूळ, कांदा व कडधान्ये या पिकांवरील निर्यातबंदीमुळे भारतातील शेतकऱ्यांना जवळपास १० लाख १२ हजार पाचशे कोटी रुपये इतके उणे अनुदान दिले गेले. ही एकच वर्षातील लूट भारतातील सर्व शेतकऱ्यांच्या पन्नास वर्षांतील थकित कर्जापेक्षा जास्त आहे. ही मागणी सरकारने त्वरित मान्य करावी. कारण गेल्या दहा वर्षांत कॉर्पोरेट कंपन्यांना 'राइट ऑफ'च्या रूपाने २५ लाख कोटी पेक्षा जास्त रक्कम वसूल करणे बंद केले आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांची कर्जे 'राइट ऑफ' करावीत किंवा मोरेटोरियम देऊन दहा वर्षे सक्तीची वसुली बंद करावी. शेतीमाल व्यापार नियंत्रित केला नसता तर शेतकरी ही कर्जफेड सहज शकला असता.

**एमएसपीच्या कायद्याचे गुन्हाळ**

आंदोलकांची महत्त्वाची मागणी आहे ती ही की शेतीमालाला आधारभूत किमतीप्रमाणे (एमएसपी) खरेदी करण्याचा कायदा करावा, हे सरकारला अडचणीचे आहे. खरे तर ज्या राज्यातून ही मागणी वारंवार केली जाते, ती राज्ये प्रामुख्याने गहू व भात पिकवतात. पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश या राज्यात पिकणारा सर्व गहू व भात सरकार आज ही खरेदी करत आहे. इतकेच नाही तर बिहारसारख्या राज्यातून स्वस्त गहू व भात खरेदी करून पंजाबमध्ये आधारभूत किमतीने विकून पैसे कमावणारे रॅकेट जोरात काम करते आहे. त्यांच्या राज्यांसाठी ही मागणीच गैरलागू आहे. असे म्हटल्यास ते म्हणतात की आम्हाला C2+५० टक्के पाहिजे. ही मागणी मान्य करणे सरकारला जड जाणार आहे. डॉ. स्वामीनाथन अहवालातील एका शिफारशीनुसार 'पिकाची आधारभूत किंमत ही पिकाच्या उत्पादन खर्चापेक्षा किमान ५० टक्के जास्त असली पाहिजे.'' सरकारच्या दृष्टिकोनातून जर अशी आधारभूत किंमत निश्चित केली तर अन्नधान्य खूप महाग होईल व देशात महागाई प्रचंड वाढेल, ही बाब खरी आहे. त्यात, अशा आधारभूत किमतीच्या खाली कोणी खरेदी करू नये व केल्यास शिक्षेची तरतूद असलेला कायदा करावा, अशी मागणी आहे. असा कायदा केला आणि एखाद्या पिकाचे गरजेपेक्षा जास्त उत्पादन होऊन दर पडले व पुढे लाभदायक किंमत देणारे ग्राहक नसतील, तर व्यापारी खरेदी करणार नाहीत. मग सरकारला हा सर्व माल खरेदी करावा लागेल, त्यासाठी आर्थिक तरतूद लागेल. व्यापाऱ्यांनी खरेदी केला नाही व सरकारनेही हात वर केले तर शेतकऱ्यांनी माल विकायचा कुठे, हा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

**एमएसपी गॅरंटी देता येईल का?**

सध्या भारतात तेवीस पिकांची आधारभूत किंमत घोषित केली जाते, पैकी फक्त गहू आणि भाताचीच प्रामुख्याने खरेदी होते बाकी पिकांची सरकारी खरेदी अगदी नगण्य होते. आंदोलकांची मागणी आता सर्व पिकांना C2+ ५० टक्केप्रमाणे हमीभावाची गॅरंटी हवी. सर्व पिकांमध्ये भाजीपाला, दूध, अंडी, कोंबडी, मासोळी वगैरे सर्व शेतीमाल येणार. धान्य, कडधान्ये काही काळ साठवून ठेवता येतात पण बाकी शीघ्र नाशिवंत मालाचे काय करणार, हा प्रश्न राहतोच. एखाद्या पिकाची आधारभूत किंमत काय असावी, हा एक गंभीर विषय आहे. सर्व पिकांच्या आधारभूत किमती या उत्पादन खर्चापेक्षा कमी आहेत, असे सर्वच शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मध्य प्रदेश मध्ये शेतकऱ्यांनी, सोयाबीन सहा हजार रुपये प्रति क्विंटलची मागणी करणारे आंदोलन केले होते. सोयाबीनची सरकारने जाहीर केलेली प्रतिक्विंटल ४८९२ रुपयांच्या तुलनेत शेतकऱ्यांनी केलेली दराची मागणी योग्य वाटते. सध्या घोषित केलेल्या हमी किमती या A2+FL आहेत. प्रत्येक राज्यातून येणाऱ्या शिफारशी वेगवेगळ्या आहेत. महाराष्ट्रातून गव्हाच्या हमीभावासाठी शिफारस चार हजार रुपये क्विंटलपेक्षा जास्त आहे. हा आकडा A2+FL चा आहे. C2+ ५० टक्केचा या पेक्षा खूप मोठा असणार आहे. सरकारने जाहीर केलेली आधारभूत किंमत २२७५ रुपये आहे! कसा मेळ बसणार?

**(लेखक स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत.)**

Agrowon, 26/12/2024

# कृषी - पणन धोरण सुधारण्याची संधी

अनिल घनवट
९९२३७०७६४६

**शेतकऱ्यांचे भले व्हावे, शेतकरी कर्जमुक्त व्हावा व शेती धंदा किफायतशीर व्हावा, ही आंदोलक शेतकऱ्यांची प्रामाणिक इच्छा दिसते. सरकारला सुद्धा नव्याने कृषी पणन धोरण ठरवायचे आहे. या संधीचा फायदा घेत सरकारने सध्या खनौरी सीमेवरील आंदोलकांशी तडजोड करताना त्यांच्या काही मागण्याही मान्य करून घ्याव्यात.**

## उत्तरार्ध

एमएसपीचा (किमान आधारभूत किंमत - हमीभाव) तिढा सोडवायचा असेल तर पहिले योग्य आधारभूत किंमत निश्चित करणे आवश्यक आहे. दिल्ली सीमेवर चालू असलेले शेतकरी आंदोलन शांत करण्यासाठी सध्या जी एमएसपी जाहीर केली आहे, तिच्या खाली खरेदी न करण्याचा कायदा करावा. हे यशस्वी झाले तर C2+५० टक्केच्या पुढे विचार करता येईल.

मुळात अन्नधान्याच्या किमती कमी का होतात? याचा विचार करायला हवा व किमती कमी होणार नाहीत यासाठी उपाय योजना करणे गरजेचे आहे. अन्नधान्याच्या किमती सरकारच्या शेतीमाल व्यापारातील हस्तक्षेपामुळे कमी राहतात. उदाहरणच द्यायचे झाले तर गहू, तांदूळ, सर्व तेलबिया, बहुतेक कडधान्यावर निर्यात बंदी आहे. त्याची मोठ्या प्रमाणात आयातही केली जाते, वायदे बाजारातून प्रतिबंधित केले जातात व त्यांच्या किमती एमएसपीच्या जवळपास आणून ठेवल्या जातात. कापसाच्या किमती वाढल्या की वस्त्रोद्योग लॉबी सरकारवर दबाव टाकते, सोयाबीनच्या किमती वाढल्या की तेल प्रक्रिया लॉबी दबाव टाकते. मक्याची किंमत वाढली की पोल्ट्री लॉबी, गव्हाच्या किमती वाढल्या की आटा, बिस्कीट लॉबी सरकारवर दबाव टाकून किमती कमी करायला लावतात. त्यांचा युक्तिवाद असा असतो की सोयाबीनची एमएसपी ४८९२ आहे मग यांना ७००० रुपये भाव कशाला मिळायला पाहिजेत? मग सरकार त्यांच्या पुढे गुडघे टेकवते व वेगवेगळे निर्बंध लादून त्या मालाचे भाव एमएसपीपर्यंत खाली आणतात. पंजाबमध्ये सरासरी १७० लाख टन गहू पिकतो. गेली दोन वर्षे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गव्हाचे दर तीन ते साडेतीन हजार रुपये होते. निर्यातबंदी नसती व पंजाबच्या गव्हाला एक हजार रुपये प्रतिक्विंटल जास्त मिळाले असते तर १७ हजार कोटी रुपये पंजाबच्या शेतकऱ्यांच्या खिशात जास्त आले असते. पंजाबच्या अर्थसंकल्पात कृषीसाठी फक्त १४ हजार ३०० कोटी रुपयांची तरतूद आहे. एमएसपीपेक्षा एक हजार रुपये जास्त दराने गहू विकला असता. आजही गव्हाचे दर पाडण्यासाठी सरकारने गोदामात साठवलेला गहू मात्र २१०० रुपये प्रतिक्विंटल दराने बाजारात आणून ओतला आहे.

अशा प्रकारे दर नियंत्रित करण्याचा अधिकार सरकारला असू नये. यासाठी आवश्यक वस्तू कायद्यातून शेतीमाल वगळला पाहिजे. सरकारच्या अशा हस्तक्षेपामुळे, एमएसपी आता 'मिनिमम सपोर्ट प्राइस' नाही तर 'मॅक्सिमम सेलिंग प्राइस' झाली आहे.

### सरकारी हस्तक्षेप थांबविण्याची हवी मागणी

शेतीमाल बाजारातील सरकारचा हस्तक्षेप पूर्णपणे थांबविण्याची मागणी शेतकऱ्यांनी करायला हवी. परंतु दुर्दैवाने आंदोलक शेतकऱ्यांच्या हे लक्षात येत नाही. शेतीमाल व्यापारातील सरकारी हस्तक्षेप थांबला तर जवळपास सर्व पिकांना एमएसपी पेक्षा जास्त किमती मिळत राहतील. सरकारला खरेदी करण्याची वेळ क्वचितच येईल. आंदोलक शेतकऱ्यांच्या या मागण्यांबरोबर बाजारपेठेच्या स्वातंत्र्याची मागणी जोडणे आवश्यक आहे. जागतिक बाजारपेठेत स्पर्धक्षम राहण्यासाठी तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य देण्याची मागणी करणे आवश्यक आहे. वायदे बाजारातील हस्तक्षेप थांबणे गरजेचे आहे. उत्तर भारतात सक्रिय असलेल्या शेतकरी संघटनांच्या मनात खुल्या व्यापाराबद्दल भीती घर करून बसली आहे, उद्योजक अदानी-अंबानी शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करतील, अशी दहशत निर्माण केली गेली आहे. यातून बाहेर पडून त्यांनी व्यावहारिक दृष्टीने शेतीमाल व्यापाराकडे पाहायला हवे.

### आंदोलकांची आक्रमकता व सरकारचा प्रतिसाद

सरकारने मंजूर केलेले तीन नवीन कृषी कायदे रद्द करावेत यासाठी २०२०-२१ मध्ये झालेल्या आंदोलनात व सध्या खनौरी बॉर्डरवर सुरू असलेल्या आंदोलनात बराच फरक दिसतो. मागील आंदोलनात आंदोलक नेते सरकारशी चर्चा करण्यास तयार नव्हते. कायदे रद्द करा इतकीच त्यांची मागणी होती. त्या वेळेस सरकार, एक एक मुद्द्यावर चर्चा करण्याची विनंती करत होते. आंदोलकांची वर्तणूक ही काहीशी आक्रमक होती. या वेळेस आंदोलन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सुरू आहे. आंदोलक नेते सरकारशी चर्चा करण्याची विनंती करीत आहेत. ट्रॅक्टरशिवाय, पायी जाण्यास तयार आहेत. फक्त शंभर प्रतिनिधी घेऊन जात आहेत. एक एक आंदोलकाला पोलिसांनी हाताला धरून चर्चेला न्यावे, असे ते म्हणत आहेत तरी सरकार मानायला तयार नाही. सरकार मात्र चर्चा न करता अधिक कठोरपणे प्रतिसाद देत आहे हे न समजण्यासारखे आहे. दुसरा काहीच अहिंसात्मक मार्ग शिल्लक न राहिल्यामुळे भारतीय किसान युनियनचे नेते जगजितसिंग डल्लेवाल यांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला. आता महिना होत आला, त्यांचा जीव धोक्यात आहे. काही अप्रिय घडावे आणि आंदोलन पुन्हा चुकीच्या नेतृत्वाच्या हातात जाण्याअगोदर सरकारने त्वरित मार्ग काढणे अपेक्षित आहे.

### सरकारने संधीचा फायदा घ्यावा

शेतकऱ्यांचे भले व्हावे, शेतकरी कर्जमुक्त व्हावा व शेती धंदा किफायतशीर व्हावा, ही आंदोलक शेतकऱ्यांची प्रामाणिक इच्छा दिसते. मागील आंदोलनासारखे राजकीय पक्षांनी प्रेरित किंवा शेतकरी नेते नसलेल्या समाजवादी नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन सुरू नाही, ही जमेची बाजू म्हणावी लागेल. सरकारला सुद्धा नव्याने कृषी पणन धोरण ठरवायचे आहे. या संधीचा फायदा घेत सरकारने आंदोलकांशी तडजोड करताना या सुधारणाही मान्य करून घ्याव्यात. देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबायचे नाव घेत नाहीत. कर्ज, शेतीमालाचे न परवडणारे दर आणि नैसर्गिक आपत्तीत शेतीचे होणारे नुकसान हे त्यास कारणीभूत आहेत. नैसर्गिक आपत्तीत नुकसान भरपाई देता येईल पण शेतकरी कर्जमुक्त करण्यास व शेतीमालाला 'रास्त' भाव मिळण्यासाठी सरकारचे, शेतकऱ्यांना लुटण्याचे धोरण बदलणे गरजेचे आहे. सरकारवर आलेले हे संकट, इष्टापत्ती समजून सरकारने आंदोलकांशी सामंजस्याने चर्चा करून सरकारच्या मनातील पणन सुधारणा करून घ्याव्यात. यात शेतकऱ्यांचा, सरकारचा आणि देशाचा फायदा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा कलंक पुसण्याचे श्रेय आंदोलक संघटना व सरकार दोघांना ही मिळेल.

(लेखक स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत.)



शेती प्रश्नांबाबत आंदोलन करताना शेतकरी. (छायाचित्र : प्रातिनिधिक)

Agrowon, 25/12/2024

# थंडीमुळे केळी निर्यातीत घट

## गुणवत्तेअभावी शेतकरी, निर्यातदारांना २०० कोटींचा फटका

**ॲग्रोवन वृत्तसेवा**



पुणे : देशातील अनेक भागांमध्ये थंडीची लाट आहे. थंडीमुळे केळीच्या गुणवत्तेवर परिणाम होत असून, निर्यातीत ३० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. याचा शेतकरी आणि निर्यातदारांना सुमारे २०० कोटी रुपयांचा फटका बसू शकतो. तर या परिस्थितीचा फायदा इक्वेडोर आणि फिलिपिन्सला होण्याची शक्यता आहे.

भारत हा केळीचा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक ही राज्ये केळी उत्पादनात अग्रेसर आहेत. या राज्यांमध्ये केळी उत्पादक पट्ट्यात तापमान १२ अंश सेल्सिअसच्या खाली गेले आहे. पान ४ वर »

**केळीची गुणवत्ता सध्याच्या वातावरणामुळे कमी झाली आहे. जो माल निर्यात होऊ शकत नाही त्याची वाहतूकही जिकिरीची होत आहे. त्यामुळे देशात केळी टंचाईसदृश परिस्थिती निर्माण होऊन दरात सुधारणा होण्याची शक्यता आहे. शेतकरी थंडीच्या आधी काढणी होईल असे लागवडीचे नियोजन करून यावर उपाय करू शकतात.**

– अजय केडिया, संचालक केडिया कमोडिटीज

# थंडीमुळे केळी निर्यातीत घट

» पान १ वरून

तसेच तापमानात चढ-उतारही सुरू आहेत. ज्यामुळे काढणीसाठी तयार असलेल्या केळीचे रंग विकृत झाले आहेत. तसेच केळीला जास्त थंडीने आतून इजाही झाली आहे.

कृषी आणि प्रक्रियायुक्त अन्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाने इशारा दिला आहे, की थंड हवेमुळे होणाऱ्या जखमांमुळे निर्यातीचे प्रमाण १५ ते ३० टक्क्यांनी कमी होऊ शकते. ज्यामुळे मोठा आर्थिक तोटा होईल. इक्वेडोर आणि फिलिपिन्ससारखे स्पर्धात्मक देश या संकटाचा फायदा घेऊ शकतात.

पिनॅकल ॲग्रोटेकचे व्यवसाय प्रमुख कौस्तुभ भामरे यांनी सांगितले, की काही व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांसोबत २४ ते २८ रुपये प्रति किलो किमतीत करार केला होता. पण सध्या हवामानामुळे केळीच्या सालीवर लाल ठिपके पडत आहेत. त्यामुळे किमती ८ ते १४ रुपयांपर्यंत खाली गेल्या आहे. ज्यांनी रशिया आणि इराणकडून पहिल्यांदाच ऑर्डर मिळवली होती. थंडीच्या लाटेमुळे निर्यातदारांना निर्यात सौदे पूर्ण करता आले नाहीत. तरीदेखील पश्चिम आशिया आणि आखाती देशांमधून मागणी मजबूत आहे.

### निर्यातीसाठी मागणी

रशिया आणि इराणमधील युद्धाचा केळी निर्यातीवर कोणताही परिणाम झाला नाही. कारण टेबल फ्रूटची मागणी कायम आहे आणि भारत हा जगातील सर्वांत मोठा निर्यातदार आहे. महाराष्ट्रातील जालना आणि सोलापूर येथे मोठ्या प्रमाणावर उगवलेली रोबस्टा केळीला जगभरात मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. थंडीचा फटका बसू नये यासाठी शेतकरी ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांत केळीची लागवड करत आहेत. जेणेकरून जुलै-ऑगस्टमध्ये काढणी करता येईल. मात्र शेतकऱ्यांना लागवडीसाठी उती संवर्धित रोपांचीही टंचाई भासत आहे, असेही भामरे यांनी सांगितले.

**थंडीमुळे केळीच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. निर्यातक्षम मालाचे भाव यामुळे कमी होत आहेत. निर्यातक्षम मालाची गुणवत्ताच कमी झाल्याने निर्यात कमी झाली. याचा फायदा इक्वेडोर आणि फिलिपिन्सला होत आहे. याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे.**

– कौस्तुभ भामरे, व्यवसाय प्रमुख, पिनॅकल ॲग्रोटेक

पुण्य नगरी

# पणन व्यवस्थेत शेतकरी हिताला प्राधान्य द्यावे !

## मंत्री जयकुमार रावल : पणन विभागाच्या आढावा बैठकीत सूचना



**दोंडाईचा :** शेतकरी हा आपल्या राज्याचा कणा असून, पणन विभागाच्या माध्यमातून शेतकरी, आडते, व्यापारी, ग्राहक यांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे हित कसे जोपासता येईल, यावर पणन विभागाने भर द्यावा, अशी सूचना राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी पणन विभागाच्या यंत्रणेला दिली आहे.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर पणन विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक मंत्री जयकुमार रावल यांनी घेतली. यावेळी महाराष्ट्र कृषी व पणन महामंडळाचे व्यवसथापकीय संचालक संजय कदम, पणन संचालक विकास रसाळ, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव श्री.खंडागळे उपस्थित होते. महाराष्ट्र कृषी व पणन मंडळ पुणे, पणन संचालक व मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजाचा आढावा मंत्री रावल यांनी घेतला. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी काम करण्यास शेतमालाचे मार्केटींग होणे गरजेचे आहे. यासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात. अधिकाऱ्यांनी संवेदनशिलपणे कामकाज करण्यासाठी कृती आराखडा तयार करावा, असे सांगितले. पणन संचालकांकडून विभागस्तरीय व जिल्हास्तरीय कामकाजाची माहिती घेतली. कृषी उत्पन्न बाजार समित्या पणन विभागाचे महत्वाचे अंग आह. त्यादृष्टीने बाजार समित्यांमध्ये शेतकरी पुरक बदल कसे करता येतील हे पहावे. मुंबई बाजार समिती ही दररोज कोट्यवधींची उलाढाल करणारी आशिया खंडातील सर्वात मोठी बाजार समिती आहे. त्यादृष्टीने आवश्यक सुधारणा व बळकटीकरण करण्याचे मंत्री रावल यांनी सांगितले. पणन विभागामध्ये मार्केटींगसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रकिया व कार्यपध्दती राबवण्यावर भर द्यावा. शेतमालाची साठवणूक वाहतूक व विक्री यासाठी आधुनिक पध्दतीचे तंत्रज्ञान वापरले पाहिजे. त्यादृष्टीने पुढील काळात आपल्या विभागाकडून नियोजन करू असेही मंत्री रावल म्हणाले. यावेळी त्यांचा अधिकाऱ्यांकडून सत्कार करण्यात आला.

Dhule Edition
Dec 24, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

Agrowon, 16/12/2024

# हमीभावाने शेतीमाल खरेदीसाठी केरळच्या धर्तीवर कायदा करावा

पणन सुधारणा अभ्यास गटाची राज्य शासनाला शिफारस

गणेश कोरे : ॲग्रोवन

पुणे : पंजाब-हरियाना सीमेवर सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सर्वच शेतीमाल हमीभावाने खरेदीचे आश्वासन राज्यसभेत दिले. मात्र नाशिवंत आणि बिगरनाशवंत शेतीमाल हमीभावाने खरेदी करताना शेतीमालाच्या दर्जाचे कारण देत, ९० टक्के शेतीमालाची खरेदी हमीभावाने होत नसल्याचे वास्तव आहे. यामध्ये खरेदीदार शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप शेतकरी संघटना करीत आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी केरळच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारने नाशिवंत शेतीमालाची देखील हमीभावाने खरेदीसाठी स्वतंत्र कायदा करावा अशी शिफारस पणन सुधारणांसाठीच्या दांगट समितीने केली आहे. पान ४ वर »

Agrowon, 16/12/2024

# हमीभावाने शेतीमाल खरेदीसाठी केरळच्या धर्तीवर कायदा करावा

» पान १ वरून

केरळ सरकारने २०२० मध्ये नाशिवंत असलेल्या १६ पिकांच्या हमीभावाने खरेदीसाठी स्वतंत्र कायदा केला. यामध्ये संबंधित पिकांच्या उत्पादन खर्चावर २० टक्के नफा धरून, आधारभूत किमती निश्चित केल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांसाठीची आणि संबंधित पिकाची कमाल शेतीधारण क्षमता १५ एकर एवढी ठेवण्यात आली असून, शेतकऱ्यांनी संबंधित खरेदी संस्थांकडे आणि शासनाकडे संबंधित पिकाची लागवड करताना नोंदणी करणे बंधनकारक केले आहे. यामुळे उत्पादनाचा अंदाज येण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या धर्तीवर महाराष्ट्र राज्याने देखील हमीभावाने नाशिवंत शेतीमाल खरेदीचा कायदा करावा, आणि याचे काम राज्याच्या कृषिमूल्य आयोगाकडे द्यावे अशी देखील शिफारस केली आहे.

**महाराष्ट्राने खालील शेतीमालाची हमीभावाने खरेदीची शिफारस**

कांदा, लसूण, टोमॅटो, मिरची, संत्री, मोसंबी, लिंबू, केळी, सीताफळ अशा बाजारभावात मोठ्या प्रमाणावर चढ-उतार होणाऱ्या निवडक शेतीमालाची शिफारस केली आहे.

**या संस्थांना खरेदी विक्रीची द्यावी परवानगी**

हमीभावाने खरेदी आणि विक्रीसाठी पणन फेडरेशन, ग्राहक महासंघ, सार्वजनिक वितरण व्यवस्था, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, खासगी व्यावसायिक आदी.

केरळच्या तुलनेत महाराष्ट्राचे कृषी क्षेत्र आणि पीक विविधता मोठी आहे. यामुळे महाराष्ट्रात हा कायदा योग्य ठरेल. सर्वच शेतीमाल हमीभावाने खरेदी होणार नाहीत. मात्र १० टक्के जरी नाशिवंत शेतीमाल हमीभावाने खरेदी झाल्यास, त्याचा बेंचमार्क तयार होईल. आणि त्या दरांचे सकारात्मक दबाव सर्व बाजारपेठेवर राहील. याचा फायदा सरकार आणि शेतकऱ्यांमधील शेतीमाल दर संघर्ष कमी करण्यास होईल.

**- सुनील पवार,** माजी पणन संचालक आणि समिती सदस्य

**हमीभावाने खरेदीसाठी केरळने निर्धारित केलेली पिके**

| पिके | आधारभूत किंमत (प्रति किलो) | कमाल उत्पादन मर्यादा | प्रति टन प्रति हेक्टरी |
|---|---|---|---|
| केळी | ३० | ३० | १० |
| टॅपिओका | १२ | १५ | |
| अननस | १५ | १४ | |
| कोहळा | ९ | ११ | |
| काकडी | ८ | १० | |
| कारले | ३० | १० | |
| पडवळ | १६ | १५ | |
| चवळी | ३४ | ८ | |
| टोमॅटो | ८ | १५ | |
| भेंडी | २० | ८ | |
| कोबी | ११ | २० | |
| गाजर | २१ | १५ | |
| लसूण (प्रक्रिया केलेले) | १३९ | ५ | |
| बटाटे | २० | १५ | |
| बीन्स | २८ | ११ | |
| बीट रूट | २१ | १२ | |

Agrowon, 10/12/2024





वर्धा : कारंजा घाडगे येथील महाऑरेंज संचालित संत्रा निर्यात सुविधा केंद्रातून हिरवी मिरचीची निर्यात करण्यात आली. या वेळी कंटेनरला हिरवा झेंडा दाखविताना महाऑरेंजचे कार्यकारी संचालक श्रीधर ठाकरे, डॉ. अर्चना कडू, प्रवीण वानखेडे.

# पंधरा टन हिरव्या मिरचीची दुबईला निर्यात

अॅग्रोवन वृत्तसेवा

वर्धा : स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची हिरवी मिरची थेट दुबईला निर्यात करण्यात यश आले आहे. या माध्यमातून या भागातील शेतकरी कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा पल्ला गाठला असून पहिल्या प्रयत्नाद्वारे सुमारे १५ टन हिरव्या मिरचीची निर्यात करण्यात आली.

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पामधून (स्मार्ट) शेतकरी उत्पादक कंपन्या शेतीमालावर आधारित प्रक्रिया उद्योगांची उभारणी करीत आहेत. त्या माध्यमातून त्या-त्या भागात शेतीमालाच्या मूल्यवर्धनाचा उद्देश साधला जात आहे. त्यापुढील टप्प्यात कंपन्यांनी पॅकिंग आणि ब्रॅण्डिंगवर देखील भर दिला आहे. एवढ्यावरच न थांबता नागपुरातील काही कंपन्यांनी आता निर्यात क्षेत्रात पदार्पण केले आहे. त्यामध्ये अंतरंग आणि इंड अॅग्रो या दोन शेतकरी उत्पादक कंपन्यांचा समावेश आहे. प्रवीण वानखेडे संचालित युनिव्हर्स एक्सपोर्टच्या सहकार्याने ही मिरची दुबईला पाठविण्यात आली. निर्यातीपूर्वीची शीतकरण प्रक्रिया पणन मंडळाद्वारे स्थापित तसेच महाऑरेंजच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या कारंजा घाडगे येथील संत्रा निर्यात सुविधा केंद्रात करण्यात आली.

निर्यात कंटेनरला हिरवा झेंडा दाखविताना महाऑरेंजचे कार्यकारी संचालक श्रीधर ठाकरे, पणन विभागाचे विभागीय व्यवस्थापक अजय कडू, आत्मा प्रकल्प संचालक डॉ. अर्चना कडू, स्मार्ट प्रकल्पाच्या नोडल अधिकारी पल्लवी तलमले, स्वाती गावंडे, बाळाराम बलगमवार, सत्यपाल ठाकरे, पंकज गिरडे उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळाराम बलगमवार यांनी केले. पंकज गिरडे यांनी आभार मानले.

**शेतीमालाचे मूल्यवर्धन त्यासोबत निर्यातीवर भर दिल्यास या भागातील शेतीमालाला चांगला दर मिळणे शक्य आहे. त्या पार्श्वभूमीवर शेतकरी उत्पादक कंपन्यांना निर्यातीकरिता प्रोत्साहित केले जात आहे.**

**- डॉ. अर्चना कडू,** प्रकल्प संचालक, आत्मा, नागपूर

नवराष्ट्र
www.navarashtra.com

**महाऑरेंजचा प्रयोग :** आता संत्र्याबरोबरच हिरव्या मिरचीही होणार निर्यात, केंद्रीय मंत्री गडकरींचे मार्गदर्शन

# विदर्भातून मिरचीचा पहिला कंटेनर दुबई रवाना





प्रवीण विघरे । नवराष्ट्र

**नागपूर.** गेल्या काही वर्षांत आयात शुल्क वाढल्याने बांगलादेशातील संत्र्यांची निर्यात नगण्य झाली आहे. विदर्भातील शेतकरी आणि महाऑरेंज निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी संत्र्यांची प्रतवारी, कोटिंग वेक्सिंग तयार करतात. यंदा महाऑरेंजने रविवारी 8 डिसेंबर रोजी मिरचीचा पहिला कंटेनर वीरदभाहून दुबईला रवाना केला आहे.

**कॉरंजा सेंटरमधून केले रवाना :** महाऑरेंजचे कार्यकारी संचालक श्रीधरराव ठाकरे म्हणाले की, पूर्वी नागपूर आणि विदर्भातील मिरची मुंबईहून दुबईला जात असे. कारण कोल्ड स्टोरेज आणि कंटेनर विदर्भात आणणे हा महागडा सौदा होता. यावर महाऑरेंजने यावेळी कारंजा केंद्रातून वॅक्सिंग आणि ग्रेडिंगचा पहिला प्रयोग करून हिरव्या मिर्चीला दुबईला पाठवले. सुरुवातीला 15 टन मिरची निर्यातदार प्रवीण वानखेडे यांनी दुबईला पाठवली आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास विदर्भ हिरव्या मिरचीच्या निर्यातीसाठीही ओळखला जाणार आहे. या कामात आत्माच्या संचालिका अर्चना कडू आणि कृषी पणन मंडळाचे विभागीय प्रशासक अजय कडू यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली.

## शनिवारी मस्कॉट येथे पाठविली संत्री

बांगलादेशने आयात शुल्क वाढवून संत्र्यांची निर्यात जवळपास बंद केली असली तरी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली महाऑरेंजने आतापर्यंत 60 टनांहून अधिक संत्र्यांची निर्यात केली आहे. महाऑरेंजचे कार्यकारी संचालक श्रीधरराव ठाकरे यांनी सांगितले की, शनिवारी महाऑरेंजने नागपूरहून ओमानची राजधानी मस्कॉट येथे 1500 किलो संत्री विमानाने पाठवली आहेत. याआधी 3 कंटेनर म्हणजेच 60 टन संत्री दुबईला पाठवण्यात आली आहेत. ओमानला पाठवण्याचीही ही पहिलीच वेळ आहे. संत्र्यासह अन्य उत्पादनांच्या निर्यातीसाठी प्रयत्न केला जात आहे.

Dec 9, 2024 Page No. 5

महाॲग्रो

Agrowon, 08/12/2024

# शिवनेरी हापूस, अकोला कागदी लिंबू, अमरावती चणा, पिंपळीला 'जीआय' स्वीकृती

गणेश कोरे

पुणे : साडेतीनशे वर्षांपूर्वी औरंगजेबाने शिवनेरी परिसरातील हापूस आंबा इराणच्या राजाला भेट म्हणून पाठविला होता. त्याबदल्यात इराणच्या राजाने २०० उंटांची भेट पाठविल्याचा उल्लेखनीय इतिहास असलेल्या जुन्नरच्या वैशिष्ट्यपूर्ण 'शिवनेरी हापूस'सह अमरावती चणा, पिंपळी आणि अकोल्याच्या कागदी लिंबाच्या भौगोलिक मानांकनांची (जीआय) स्वीकृती झाली आहे. याबाबतची भौगोलिक उपदर्शन पत्रिका चेन्नईच्या जीआय नोंदणी कार्यालयाने प्रसिद्ध केली आहे. यावर हरकती, सूचनांनंतर अंतिम मान्यता मिळणार आहे.

केंद्र सरकारच्या चेन्नई येथील जिओग्राफिकल इंडिकेशन्स विभागाने या संदर्भातील भौगोलिक उपदर्शक पत्रिका (जर्नल) प्रसिद्ध केले आहे. यामध्ये शिवनेरी आंब्याबरोबरच कृषी विभागात अमरावतीतील पिंपळी ही औषधी वनस्पती, अमरावती चणा आणि अकोल्यातील कागदी लिंबाला देखील मानांकनासाठी (जीआय) स्वीकृती सादर केली आहे.

जुन्नर भागातील हापूसचा आकार, वजन, चव, रंग आणि वासाने इतर आंब्यापेक्षा तसेच रत्नागिरी हापूसपेक्षा पूर्ण वेगळा आहे. ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये मध्ययुगीन कालखंड आणि शिवकाळात या आंब्याचा उल्लेख आहे. या आंब्याला भौगोलिक मानांकन मिळण्यासाठी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी ही संकल्पना मांडली. याबाबतचा पत्र व्यवहार २०१८ मध्ये तत्कालीन कृषिमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे केला होता. यानंतर या विषयाला चालना मिळाली.

यानंतर तत्कालीन पालकमंत्री अजित पवार यांनी 'जीआय' मानांकनासाठी जिल्हा नियोजन समितीमधून २५ लाख रुपयांचा निधी जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयाला दिला. यानंतर आंब्याचे ऐतिहासिक आणि शास्त्रोक्त माहिती पुरावे संकलनाची जबाबदारी नारायणगाव येथील कृषी विज्ञान केंद्रावर सोपविण्यात आली. या ऐतिहासिक शास्त्रोक्त माहिती संकलनासाठी कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. प्रशांत शेटे, भारत टेमकर, प्रा. डॉ. लहू गायकवाड यांच्यासह उपवनसंरक्षक अमोल सातपुते, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी विशेष कष्ट घेतले होते. या स्वीकृतीवर हरकती, सूचनांनंतर अंतिम मान्यता मिळेल, असे तज्ज्ञांनी स्पष्ट केले.

सविस्तर वृत्तांकन पान ११ वर ...

# भौगोलिक मानांकनातून समृद्धीकडे...

गणेश कोरे, अमित गद्रे

**वैशिष्ट्यपूर्ण हवामान, माती, पाणी आणि चवींसाठी प्रसिद्ध असलेल्या जुन्नर (जि. पुणे) परिसरातील शिवनेरी हापूस, अकोला विभागातील 'कागदी लिंबू' आणि अमरावतीचा 'चणा' आणि 'पान पिंपळी' या औषधी वनस्पतीला भौगोलिक मानांकनासाठी स्वीकृती झाली आहे. या प्रक्रियेबाबत घेतलेला आढावा...**

## अमरावती चणा



अमरावती जिल्हा प्रामुख्याने मेळघाट आणि सातपुड्याच्या पर्वतरांगामध्ये विभागला आहे. पूर्णा नदीचा उगम सातपुडा पर्वतांमधून होतो. पूर्णा नदीच्या खोऱ्याजवळ खारपणपट्टा आहे. या भागातील मातीमध्ये क्षार अधिक असल्याने कोणतेही पीक घेतले जात नाही. मात्र हरभऱ्याचे पीक उत्तम होत असून, त्याच्या चवीत नैसर्गिक मिठाची चव जाणवते. हा वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म उल्लेखनीय असल्यामुळे अमरावतीच्या चण्याला भौगोलिक मानांकनासाठी स्वीकृती मिळाली.

## शिवनेरी हापूस



रत्नागिरी, देवगड सोबत जुन्नर परिसरात देखील हापूस आंबा लागवड मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते. जुन्नरपट्ट्यातील हापूस आंबा कोकणपट्टीपेक्षा वेगळा कसा हे शास्त्रीयदृष्ट्या पटवून देण्याचे आव्हान अभ्यासकांसमोर होते. पुण्यातील आघारकर संशोधन संस्थेने 'शिवनेरी हापूस'चे डीएनए पृथक्करण करून त्याचा वेगळेपणा सिद्ध केला.

याचबरोबरीने संशोधनासाठी संदर्भ तपासताना सातवाहनकालीन 'गाथासप्तशती' या ग्रंथामध्ये या परिसरातील आंब्याचा उल्लेख मिळाला. निजामशाहीचा वजीर मलिक अंबर याचा जुन्नरमधील महाल परिसर हा 'हापूस बाग' म्हणून महसुली गाव असा उल्लेख आहे. हे पुरावे आणि झाडांच्या वयाच्या शास्त्रीय आधारावर 'शिवनेरी हापूस'साठी भौगोलिक मानांकन स्वीकृती प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे.

> छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याला पिकणारा आंबा म्हणून आम्ही 'शिवनेरी हापूस' हे नाव देऊन भौगोलिक मानांकनासाठी स्वीकृतीचा प्रस्ताव दिला आहे. यामुळे जुन्नर तालुक्यातील आंबा लागवडीचे क्षेत्र वाढून शेतकऱ्यांना फायदा होईल. जुन्नर परिसरातील द्राक्षासोबत शिवनेरी हापूसही पर्यटकांचे आकर्षण ठरेल.
>
> **- अ‍ॅड. गणेश हिंगमिरे**, भौगोलिक मानांकन तज्ज्ञ

चेन्नईच्या जीआय नोंदणी कार्यालयाने 'शिवनेरी हापूस' संदर्भात भौगोलिक उपदर्शन पत्रिका प्रसिद्ध केली आहे. याबाबत दावे प्रतिदावे होऊन, त्यावर जीआय नोंदणी कार्यालय आपले मत प्रकाशित करेल. सध्या गुजरातमधील 'बलसाड हापूस' चा प्रस्ताव देखील जीआय कार्यालयाकडे दाखल आहे. त्यावर रत्नागिरी येथील कोकण हापूस आंबा उत्पादक, प्रक्रिया आणि विक्रेते सहकारी संस्थेने हरकत नोंदविली आहे. त्यावर सविस्तर चर्चा होऊन जीआय कार्यालय अंतिम निर्णय घेईल.

**- डॉ. किरण मालशे**, कृषिविद्यावेत्ता,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली

आम्ही कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर आणि ठाणे या पाच जिल्ह्यांसाठी 'हापूस मँगो' नावाने २०१८ मध्ये जीआय मानांकन घेतले आहे. यासाठी आम्ही २००८ पासून प्रयत्न करत होतो. हापूस हा जीआय आमचाच असून, इतर कोणीही तो वापरू शकत नाही. त्यामुळे आम्ही 'बलसाड हापूस' आणि 'शिवनेरी हापूस' यावर हरकत घेत आहोत. यावर जीआय लवाद सर्व तांत्रिक बाबी ऐकून अंतिम निर्णय घेईल. आमचे जीआयचे हक्क चार संस्थांना असून, त्यामध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली, देवगड तालुका आंबा उत्पादक संघ, केळशी पंचक्रोशी आंबा उत्पादक संघ आणि कोकण हापूस आंबा उत्पादक, प्रक्रिया आणि विक्रेते सहकारी संस्था, रत्नागिरी यांचा समावेश आहे.

**- डॉ. विवेक भिडे**, अध्यक्ष, कोकण हापूस आंबा उत्पादक,
प्रक्रिया आणि विक्रेते सहकारी संस्था, रत्नागिरी

'शिवनेरी हापूस' आंब्याच्या भौगोलिक मानांकनासाठी मिळालेली स्वीकृती हा जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना यश आहे. यामुळे या भागातील आंबा साता समुद्राच्या पलीकडे जाऊन 'शिवनेरी हापूस'ला ओळख मिळेल. त्याचा आर्थिक स्वरूपात फायदा होईल.

**- कृषिरत्न अनिल मेहेर**, अध्यक्ष, कृषी विज्ञान केंद्र, नारायणगाव, ता. जुन्नर, जि.पुणे



## अमरावती पान पिंपळी

पान पिंपळी ही सातपुडा, मेळघाट डोंगररांगांच्या परिसरातील औषधी वनस्पती. या भागात पिंपळीची भाजी केली जाते, इतर राज्यांमध्ये मसाला निर्मितीसाठी या वनस्पतीस मागणी आहे. त्यामुळे पान पिंपळीची लागवड विस्तारली. पिंपळीचे औषधी गुणधर्म आणि वैशिष्ट्ये लक्षात घेऊन भौगोलिक मानांकनाच्या स्वीकृती मिळाली आहे.

पिंपळी ही औषधी वनस्पती असून अमरावती विभागात अनेक वर्षांपासून त्याचा भाजी म्हणून उपयोग होतो. अमरावती परिसरातील पिंपळी ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. मेळघाट पायथ्यापाशी असलेल्या भौगोलिक वैशिष्ट्यांचे योगदान या वनस्पतीला मिळाले आहे. सातपुडा पर्वतरांगांच्या पायथ्यापाशी वसाहत असलेल्या समूहाकडून शेकडो वर्षांपासून पिंपळी उत्पादन घेतले जाते. देशभरात वेगवेगळ्या औषध कंपन्यांना पुरवठा होतो. योग्य किंमत मिळविण्यासाठी 'जीआय मानांकन' मिळणे गरजेचे होते. यामुळे येथील शेतकरी अधिकाधिक पिंपळी उत्पादन घेतील.



## अकोल्याचे कागदी लिंबू

अकोला जिल्ह्यात उत्पादित होणारे कागदी लिंबू वैशिष्ट्यपूर्ण आहे. भरपूर रस आणि कागदासारखी पातळ साल असल्याने 'कागदी' हे नामकरण झाले. केंद्रीय कृषी मंत्रालयाने १९७५ मध्ये घेतलेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये या लिंबास देशातील सर्वोत्तम लिंबाचा दर्जा देण्यात आला होता. अकोला जिल्ह्यातील काही गावांमध्ये आजही तीस वर्षांहून अधिक वयाची लिंबाची मोठी झाडे बघायला मिळतात. हैदराबादच्या निजामाला ही लिंबे विशेष आवडत असत. त्यामुळे मातीच्या भांड्यात मिठामध्ये या लिंबांची साठवण केली जात असल्याचे ऐतिहासिक संदर्भ आहेत. अकोल्याची ओळख असलेल्या या लिंबाच्या भौगोलिक मानांकनाच्या प्रस्तावास स्वीकृती मिळाली आहे.

www.agrowon.com
सकाळ
मित्र ग्लोबल शिवाराचा..
अॅग्रोवन
पुणे, सातारा, अहिल्यानगर, कोल्



छत्रपती संभाजीनगर । रविवार, ८ डिसेंबर २०२४ । पाने १६ । किंमत ₹ ३ ।

Agrowon, 08/12/2024

# शेतीमाल मार्केटमध्ये सुधारणांसाठी कायदा

## केंद्राकडून मसुदा जाहीर; १० डिसेंबरपर्यंत सूचना मागवल्या

अनिल जाधव / अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : दिल्लीत शेतकरी आंदोलनाची धग पेटलेली असतानाच केंद्राने शेतीमाल बाजार व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी एक कायदा आणण्याची तयारी केली आहे. 'नॅशनल पॉलिसी फ्रेमवर्क ऑन अॅग्रिकल्चरल **मार्केटिंग**', **अर्थात** शेतीमाल विपणन राष्ट्रीय धोरण मुसदा केंद्राने आणला आहे. या मसुद्यावर सूचनाही मागविण्यात आल्या आहेत.



केंद्र सरकारने २०२० मध्ये तीन कृषी कायदे आणले होते. त्यावरून ऐतिहासिक असे शेतकरी आंदोलन झाल्यानंतर केंद्राला हे तिन्ही कृषी कायदे मागे घ्यावे लागले. त्यामुळे केंद्र सरकार आता शेतीमाल विक्री व्यवस्थेत बदल करताना राज्यांना सोबत घेत आहेत. पान ४ वर ›

# शेतीमाल मार्केटमध्ये सुधारणांसाठी कायदा

› पान १ वरून

केंद्राने राज्यांना राष्ट्रीय धोरण मसुद्याशी सुसंगत राज्याचा धोरण मसुदा तयार करण्यास सांगितले आहे. म्हणजेच केंद्र आणि राज्य दोन्हींचे धोरण एकाच धोरणाला अनुसरून असेल.

मात्र या शेतीमाल मार्केटिंग नॅशनल पॉलिसी फ्रेमवर्कमध्ये सध्यातरी हमीभावाने खरेदीची अट टाकलेली नाही. या प्रक्रियेत असलेल्या काही अधिकाऱ्यांनी सांगितले, की सध्या या कायद्यावर सूचना मागवल्या आहेत. तसेच जीएसटीसाठी ज्याप्रमाणे राज्यांच्या अर्थमंत्र्यांची एक समिती आहे, तशीच राज्यांच्या शेतीमाल मार्केटिंग मंत्र्यांची शेतीमाल मार्केटिंग सुधारणा समिती असेल. ही समिती वेळोवेळी सल्लामसलत करून सुधारणा आणि बदल करेल. ही समिती सल्लामसलत करून देशपातळीवर शेतीमाल विक्रीला बळकटी देण्यासाठी एक लायसन किंवा एकच नोंदणी आणि एकच शुल्क, अशा धोरणाकडे जाईल.

तसेच या समितीचे अध्यक्षपद कोणत्याही राज्याच्या मंत्र्याकडे बदलत जाईल. या मसुद्यावर पहिली सूचना आली, सध्या अस्तित्वात असलेल्या खासगी आणि सरकारी बाजारांच्या माध्यमातून कार्यक्षमता आणि स्पर्धा वाढण्यासाठी कायद्यात बदल करावा. अनेक राज्यांनी शेतीमाल बाजारात सुधारणा केल्या. आजही बाजार समित्यांना पर्याय विकसित होऊ शकला नाही. देशपातळीवर खरेदी-विक्रीचे एकच लायसन असेल तर मोठा बदल होऊ शकतो, अशी सूचना आली आहे.

### काय आहे प्रस्ताव?

देशातील बाजार समित्यांसह शेतीमाल खरेदी केंद्रे, अॅग्रिगेशन सेंटर्स, खासगी बाजार, ग्रामीण शेतीमाल बाजार, शेतकरी उत्पादन कंपन्यांचे आवार, सामाईक शेती व्यवसाय केंद्रे आणि बाजार आवार थेट ई-नामशी जोडण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. देशात सध्या ७०० थेट विक्री बाजार आहेत. महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि कर्नाटक या राज्यांमध्ये १२५ खासगी बाजार समित्या आहेत. २२ हजार ९३१ ग्रामीण बाजार, ७ हजार ५७ बाजार समित्या आहेत.

### प्रस्तावित सुधारणा

- शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळावा यासाठी बाजारांची कार्यक्षमता वाढवणे.
- सध्या अस्तित्वात असलेल्या बाजारांमध्ये स्पर्धा निर्माण करणे आणि एकाधिकारशाही मोडीत काढणे.
- शेतीमाल बाजारात पारदर्शकता आणणे, पायभूत सुविधांचा विकास करणे.
- शेतीमाल बाजारात अद्ययावत डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे.
- शेतीमाल मूल्य साखळीनुसार मार्केटिंगचा विकास करणे.

Agrowon, 07/12/2024

देश - विदेश

# नागपुरी संत्रा आज जाणार मस्कतला

अॅग्रोवन वृत्तसेवा

नागपूर : चव आणि रंगासाठी ओळखल्या जाणाऱ्या नागपुरी संत्र्याला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न महाऑरेंजकडून होत आहे. त्याच प्रयत्नांतर्गत शनिवारी (ता. ७) ओमानची राजधानी मस्कत येथे नागपुरी संत्र्याची पहिल्यांदाच निर्यात केली जाणार आहे.

नागपुरी संत्र्याची टिकवणक्षमता कमी आहे. परिणामी, त्याच्या निर्यातीला देखील मर्यादा आहेत. परंतु गेल्या काही वर्षांत या भागात संत्र्याची टिकवणक्षमता वाढीसाठी पूरक ठरणाऱ्या प्राथमिक प्रक्रिया केंद्राची संख्या वाढीस लागली आहे. पहिल्या टप्प्यातील प्रक्रियेत संत्रा फळांचे क्लिनिंग, ग्रेडिंग आणि त्यावर वॅक्स कोटिंग केले जाते. हा पर्याय टिकवणक्षमता काही अंशी वाढीस पूरक ठरणारा आहे. यापूर्वी संत्र्याची बांगलादेशला निर्यात होत होती. परंतु गेल्या काही महिन्यांपासून तेथे राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. परिणामी, निर्यात उत्पादनांचा रोख परतावा मिळत नसल्याचे व्यापारी सांगतात. त्यामुळे बांगलादेशला होणारी संत्रा निर्यात प्रभावित झाली आहे. त्याचा फटका बसत देशांतर्गत बाजारात संत्र्याचे दर दबावात आले आहेत. त्यामुळेच इतर देशाची बाजारपेठ



शोधण्याचा प्रयत्न सध्या होत आहे. त्याच प्रयत्नातून खासगी निर्यातदाराच्या माध्यमातून पहिल्यांदाच ओमानची राजधानी मस्कत येथे संत्रा निर्यात केली जाणार आहे. नागपूर विमानतळावरून शनिवारी (ता. ७) संत्र्याची १५०० किलोची पहिली खेप रवाना होणार आहे.

> आखाती देशांमध्ये यापूर्वी निर्यातीचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. आता विमानाच्या माध्यमातून १५०० किलो संत्र्याची निर्यात मस्कतला केली जाणार आहे. नागपुरी संत्र्याच्या निर्यातीला जागतिक बाजारपेठ मिळविण्यासाठी अशा प्रयत्नात सातत्य राखले जात आहे.
>
> **- श्रीधर ठाकरे,** कार्यकारी संचालक, महाऑरेंज

Agrowon, 03/12/2024

# श्रीलंकेकडून कांदा आयात शुल्कात २० टक्के कपात



## दर स्थिर राहण्यासाठी कांदा उत्पादकांना दिलासा; मागणीत वाढीची शक्यता

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : श्रीलंकेत उत्पादित होणारा कांदा संपुष्टात आल्याने भारतातून कांदा मागविण्यासाठी श्रीलंका सरकारने आयातीवरील शुल्कात २० टक्के कपात केली आहे. भारतीय निर्यातदारांना आता केवळ १० टक्के निर्यात शुल्क द्यावे लागेल. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना याचा काही प्रमाणात फायदा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, बांगलादेशनंतर श्रीलंका सर्वात मोठा आयातदार देश आहे. त्यामुळे कांद्याच्या मागणीत वाढ शक्य असून दर स्थिर राहण्यास मदत होईल.

देशातून दरवर्षी साधारणतः २५ लाख टन कांद्याची विविध देशांत निर्यात होते. यात एकट्या श्रीलंकेचा वाटा नऊ टक्के इतका आहे. आयात- निर्यातीच्या धोरणात चढ-उतार होत गेल्याने निर्यातीच्या आकड्यांमध्ये सातत्याने बदल होत गेला. २०२३ मध्ये देशातून १७ लाख टन कांद्याची निर्यात झाली.

आता कांद्यावरील निर्यात शुल्क अवघे २० टक्के असल्याने निर्यातदारांना खुल्या पद्धतीने व्यापार करणे शक्य होत आहे. मात्र, श्रीलंकेने कांदा आयातीवर ३० टक्के शुल्क लागू केले होते. त्यांच्या देशात ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर या तीन महिन्यांत उत्पादित झालेला कांदा आता जवळपास संपण्यावर आहे. अशा परिस्थितीत कांद्याचे दर वाढल्यास जनतेत असंतोष निर्माण होईल. या गोष्टींचा विचार करून श्रीलंका सरकारने रविवार (ता. १) पासून कांदा आयातीवर केवळ १० टक्केच शुल्क ठेवले आहे.

परिणामी, भारतातून आता खरीप (लाल) कांद्याची मोठ्या प्रमाणात निर्यात होऊ शकते. हा कांदा जास्त काळ साठविला जाऊ शकत नाही. आवक वाढल्यावर कांद्याचे दर कोसळण्याची भीती काही अंशी कमी झाली आहे.

**“ श्रीलंकेत स्थानिक कांदा उपलब्ध असल्याने १३ ऑगस्टपासून प्रतिकिलो ३० रुपये आयात शुल्क होते. त्याला स्थानिक लेव्ही असे संबोधले जाते. आता श्रीलंकेने कांद्यावरील निर्यात शुल्क कमी केल्याने देशातील खरीप कांद्याचे दर स्थिर राहतील. श्रीलंकेला भारतातून मोठ्या प्रमाणात निर्यात होते. त्याला अधिक चालना मिळण्यास मदत होईल.**

– **विकास सिंग**, उपाध्यक्ष, भारतीय फलोत्पादन निर्यात संघटना